संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मतयंत्रांविरोधात राज्यभर वाढता असंतोष

**महापालिका** निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यापासून राज्यभर मतदान करताना वापरल्या जाणाऱ्या इव्हीएम मशिन्सविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेक ठिकाणी या स्वयंचलित मतदान यंत्रामध्ये प्रचंड गोंधळ असल्याचे आढळून आले. नाशिकमध्ये तर एका अपक्षाला स्वतःचेदेखील मत मिळालेले नाही. तर दुसरीकडे ज्या बूथवर २३ हजार मतांची नोंदणी झाली तिथल्या मशिन्समधून प्रत्यक्षात २७ हजार मते नोंदली गेल्याचा अभूतपूर्व प्रकार घडला आहे. अशा एक दोन घटना असत्या तर कदाचित त्याकडे डोळेझाक होऊ शकली असती. परंतु मुंबईतल्या प्रत्येक उपनगरात आणि त्यातही पूर्व उपनगरातल्या मुलुंडमधल्या जवळपास सत्तर ते ऐंशी मतदान केंद्रांवर या इव्हीएम मशिनने गोंधळ घातल्याचे समोर आले आहे. याशिवाय नाशिक, पुणे, अकोला, याठिकाणीदेखील इव्हीएम मशिनमधून नोंदल्या गेलेल्या मतांमध्ये कमालीचा फरक आढळून आलेला आहे. राजकीय पक्षांना याचा फटका तर बसला आहेच. परंतु या सगळ्या गडबडीचा लाभ सत्ताधारी भारतीय जनता पार्टीला झाल्याचे सांगितले जात आहे. या सगळ्या नाराजीचे असंतोषामध्ये रुपांतर होत आहे. मशिन्समधील हा गोंधळ एका विशिष्ट कंपनीला हाताशी धरून घातला गेला. आणि जाणीवपूर्वक भारतीय जनता पार्टीला अधिक मते पडतील अशा प्रकारचे सॉफ्टवेअर किंवा प्रोग्रॅम्स त्यात बसवले गेले, असा थेट आरोप सर्वच राजकीय पक्षांनी केला आहे. याविरोधात मुंबईमध्ये मुलुंड उपनगरात शिवाय नाशिक, पुणे, अकोला याठिकाणी सर्वपक्षीय मोर्चे काढले गेले. पुण्यात तर इव्हीएम मशिनची प्रतिकात्मक अंत्ययात्राच काढली गेली. या सर्वपक्षीय आंदोलकांनी फेरनिवडणुकीची मागणी केली आहे. शिवाय निवडणूक आयोगाने या सगळ्याचा तपास करावा. तसेच एकत्रितपणे न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी सुरू आहे. आतापर्यंत इतक्या मोठ्या प्रमाणावर या स्वयंचलित यंत्राविषयी तक्रारी झाल्या नव्हत्या, यंदा प्रथमच त्याविरोधात संघटितपणे आणि उत्स्फूर्तपणे असंतोष व्यक्त होताना दिसत आहे. निवडणूक आयोग यासंदर्भात कोणतीही प्रतिक्रिया द्यायला तयार नाही किंवा यंत्रांमधल्या गोंधळाविषयी खुलासाही करायला तयार नाही, हे त्यातले सर्वात मोठे आश्चर्य ठरते. निवडणूक आयोग जितके जास्त मौन बाळगेल तेवढा या स्वयंचलित यंत्रामधील गोंधळाविषयी संशय वाढत राहील. आतापर्यंत काही उमेदवारांनी जी माहिती गोळा केली आहे ती पाहिल्यावर कुठेतरी पाणी मुरत असल्याचेच त्यातून आढळून येते.

**लोकशाहीतली महत्त्वाची प्रक्रिया**

ज्या लोकशाहीत मतदान प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जाते. ती निर्दोष, निष्पक्ष असावी, म्हणूनच तिला गुप्त मतदानाचे कवच बहाल केले गेले. सुरुवातीच्या काळात मतपत्रिकांवर शिक्के मारून नंतर त्याचे वर्गीकरण केले जायचे. आणि मग मतमोजणीला सुरुवात होत असे. परंतु हा सगळा व्याप मोठा असायचा. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात ही सगळी प्रक्रिया निर्दोषपणे राबवणे म्हणजे एक मोठे आव्हान ठरते. यासाठी लागणारा वेळ वाचावा आणि खर्च कमी व्हावा. या उद्देशाने स्वयंचलित मतयंत्रे वापरण्याचा निर्णय घेतला गेला. अगदी लोकसभा निवडणुकीनंतर मतयंत्रांविषयी कोणीही तक्रार केली नव्हती. परंतु महापालिका निवडणुकांमध्ये वापरल्या गेलेल्या या स्वयंचलित मतयंत्राविरोधात जोरदार तक्रारी झाल्या. मतदाराला त्याचे मत या यंत्राद्वारे नोंदवता जरीयेत असले तरीदेखील जर त्या मशिन्समधली रचना एक विशिष्ट प्रणाली वापरून बदलता येते. आणि त्याचा फायदा एखाद्या विशिष्ट पक्षालाच करून देता येऊ शकतो. ही गोष्ट जर खरी असेल तर मात्र हे स्वयंचलित मतयंत्रे गोपनीय मतदानासाठी विश्वासार्ह नाही.आणि म्हणून त्याच्या जोडीला मतदाराला आपण कोणाला मतदान केले आहे. हे समजण्याची व्यवस्था झाली पाहिजे. जगामधल्या सगळ्याच प्रमुख देशांमध्ये मतपत्रिका वापरूनच मतदान केले जाते. मग भारतातच त्याचा एवढा आग्रह धरण्याचे कारण काय, यासंदर्भात लोके नावाच्या एका इंजिनिअर तरुणाने प्रात्यक्षिकही करून दाखवले होते. मतयंत्रात विशिष्ट प्रकारे बदल केला तर ठरावीक बटण दाबल्यानंतर एकापेक्षा जास्त मते एकाद वेळेला नोंदली जातात. हे उघडपणे दाखवून दिलेल आहे. राष्ट्रपतींकडे त्यांनी यासंदर्भात तक्रारही केली होती. राष्ट्रपतींनादेखील त्यामध्ये तथ्य असल्याचे आढळून आले होते. आता शेवटी लोके यांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. ही जर इतक्या उघडपणे इव्हीएम मशिनमध्ये लबाडी पुढे येत असेल तर त्याविरोधात केवळ राजकीय पक्षच नव्हे तर मतदारांनीसुध्दा संघटित होणे गरजेचे ठरते.